TRIMURTI EDUCATION SOCIETY'S VIMALBAI UTTAMRAO PATIL ARTS LATE DR. B. S. DESALE SCIENCE COLLEGE SAKRI, MAHARASHTRA

Email id- vimalbaipatilcollege@gmail.com

त्रिमूर्ती शिक्षण संस्था, साक्री जि. धुळे
साक्री
स्थापना १९९८

नॅक प्रमाणित

श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै. डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय साक्री ता. साक्री जि. धुळे महाराष्ट्र

Principal- Dr. P. S. Sonawane M.A, Ph.D
Mobile No.-7588318995

# पर्यावरण शास्त्र विषयाचा प्रकल्प अहवाल

**(शै. वर्ष २०२१ -२२)**

महाविद्यालयातील पर्यावरण शास्त्र या प्रथम वर्ष कला व विज्ञान या शाखेतील विद्यार्थ्यांसाठी सक्तीचा असणाऱ्या अभ्यासक्रमात अभ्यासक्रमास २० मार्क साठी प्रोजेक्ट वर्क आहे. कोरोना आपत्तीच्या काळात म्हणजेच शैक्षणिक वर्ष 2020-21 मध्ये कोरोनाग्रस्त पेशंट साठी संपूर्ण भारतात ऑक्सिजनचा खूप मोठा तुटवडा निर्माण झाला होता. जनता किंवा सरकार सर्वत्र ऑक्सिजनच्या गरज पूर्ततेसाठी धावाधाव करत होते यावरून एक लक्षात आले मानवी जीवनासाठी ऑक्सिजन हा घटक अति महत्त्वाचा आहे आणि वृक्षांच्या माध्यमातून अविरतपणे मोफत मोठ्या प्रमाणात वातावरणात ऑक्सीजन पुरवठा केला जात असतो. मानवाला खऱ्या अर्थाने ऑक्सिजनचे महत्त्व या आपत्तीच्या काळात जास्त प्रमाणात लक्षात आले आणि म्हणून स्वतःहून ऑक्सिजनचा पुरवठा जास्तीच व्हावा म्हणून वृक्ष लागवडीकडे आकर्षित झाला.

गेल्या तीन-चार वर्षापासून पर्यावरण शास्त्राच्या विषयातील नवनवीन प्रोजेक्ट करत असताना एखाद्या क्षेत्राचा प्रकल्प अहवाल तयार करण्यापेक्षा बीज संकलन व डोंगरावर बिजारोपण करणे हा प्रकल्प जास्त पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टिकोनातून फायदेशीर वाटला कोरोना काळात आम्ही डोंगरावर जे बीजारोपण कार्य करत होतो ते पाहून डोंबिवली येथील उद्योगपती आकर्षित झाले व आमच्याकडून त्यांनी माहिती घेतली की नेमकं तुम्ही काय करतात आम्ही त्यांना आमचे ध्येय उदाहरण स्पष्ट केले. त्यांना आमची संकल्पना इतकी

छान आवडली की त्यांनी आम्हाला या डोंगराला हिरवेगार करण्यासाठी काय करता येऊ शकते याविषयी माहिती घेतली त्यावर आम्ही त्यांना एक मत स्पष्ट केले की जर या डोंगरावर पाणी पाईपलाईनच्या माध्यमातून पोचविले गेले तर या ठिकाणी सुंदर असे वन तयार होईल व येथील परिसंस्था विकसित होत जाईल. त्यांनी आम्हाला सांगितले जर तुम्ही या डोंगरावर वृक्षारोपण करण्याची व संवर्धन करण्याची जबाबदारी घेत असाल तर मी जेवढा खर्च पाईपलाईन करण्यासाठी लागेल तेवढा खर्च मी देईल. त्यांनी मत व्यक्त केले कोणताही स्वार्थ न पाहता तुम्ही ज्या पद्धतीने कार्य करत आहात ते पाहून मी आकर्षित झालो त्यामुळे तुम्ही सांगाल तशी मदत करायला मी तयार आहे असे त्यांनी आश्वासन दिले. सुरुवातीला आम्हाला हे साहेब सहज गप्पा मारण्यासाठी असे आश्वासन देत आहेत मात्र पुढच्या एक महिन्यात त्यांनी आमच्याकडून प्रोजेक्ट रिपोर्ट मागवला व या कार्यासाठी लागणारा खर्च घेतला तात्काळ त्यांनी आम्हाला तीन दुकानावरून पाईप मोटार इत्यादीचं दर पत्रक मागविले व जैन कंपनीच्या पाईप व मोटार ची निवड करून दुकानदाराच्या खात्यावर ऑनलाइन पैसा जमा केला व आम्हास ते साहित्य उपलब्ध करून दिले. आम्ही सुद्धा संधीचे सोने केले व प्रामाणिकपणे पाईपलाईन करून पाणी पोचविले आमच्या या कार्याकडे सुरुवातीला जनता दुर्लक्ष करत होते मात्र सातत्याने रामनगर चा डोंगरावर जे कार्य सुरू आहे त्यात अनेक पर्यावरण प्रेमी मित्र एकत्र येऊ लागले परिणामी वन विभाग सुद्धा आम्हाला झाडे पुरवू लागले तसेच या उद्योगपतींकडून ठिबकची सुविधाही करून देण्यात आली व भविष्यात सुद्धा वृक्ष संवर्धन लागवडी करण्यासाठी काही आर्थिक मदत आवश्यक असल्यास ते देण्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या संपूर्ण प्रक्रियेमुळे आमच्या पर्यावरण विभागाच्या विद्यार्थ्यांनाही खूप आनंद झाला व या चळवळीत शैक्षणिक विद्यार्थी सहभागी होऊ लागले उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात असणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या प्रमुखांना सोशल मीडियाच्या माध्यमातून जेव्हा आमच्या कार्याची माहिती पोहोचली तेव्हा त्यांनी राष्ट्रीय सेवा योजने चे निवासी शिबिर या

गावाला घेण्याविषयी मत व्यक्त केले व विद्यापीठाच्या माध्यमातून ही येथे एक दिवशी कार्यशाळा मंजूर करून देण्याविषयी आश्वासन दिले. खरं म्हणजे ही संपूर्ण प्रक्रिया एक साखळीप्रमाणे जोडली जात आहे. आम्ही स्वप्नात सुद्धा कल्पना केली नव्हती की आम्ही बीज बँक तयार करून डोंगर परिसंस्थेमध्ये जे रुजवण्याचा स्वप्न पाहिला आहे त्यास इतके मोठे वैभव प्राप्त होईल. आता आमच्या मध्ये नवचैतन्य जागृत झाले असून हा संपूर्ण डोंगर लवकरात लवकर वृक्ष लागवड व संवर्धन करून एक छान असं जंगल तयार करण्याचा मॉडेल प्रकल्प म्हणून आम्ही याकडे पाहत आहोत. मोठ्या प्रमाणात तरुण या प्रकल्पाकडे आकर्षित होत असून आजी विद्यार्थी माजी विद्यार्थी महाविद्यालयाने दत्तक घेतलेला डोंगर म्हणून ओळखू लागले व सदिच्छा भेट देऊन स्वतःहून वृक्ष लागवड करू लागले म्हणजे आता जन आंदोलन सुरू होण्याच्या स्थितीवर आमचा प्रकल्प उभा राहत आहे.

आमच्या संस्थेचे सेक्रेटरी डॉ मंगलाताई देसले संस्थेचे अध्यक्ष सौ मृणालताई देसले व महाविद्यालयाचे प्राचार्य पी एस सोनवणे या सर्वांनी आमच्या या कार्याचे कौतुक केले व महाविद्यालयाच्या पर्यावरण विभागाच्या वतीने उत्तरोत्तर अशीच प्रगती होत जावो या शुभेच्छा दिल्या. प्रामाणिकपणाने केलेल्या कामाला इतक्या लवकर प्रतिसाद मिळेल याची शाश्वती नव्हती मात्र हेतू प्रामाणिक असला तर निश्चितच कोणतेही कार्य यशस्वी होत नाही याचे उत्तम उदाहरण पाहायला मिळाले.

**पर्यावरणशास्र अभ्यास सक्तीचा असणाऱ्या विषयातील महाविद्यालयात**

**विध्यार्थ्यानी केले बीज संकलन २०२१-२२**

**बीज संकलन केलेले मा. प्राचार्य यांच्याकडे सुपूर्द करतानाचा फोटो**




बातमी

श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै डॉ बी एस देसले विज्ञान महाविद्यालय येथील पर्यावरण विभागाच्या वतीने महाविद्यालयात बीज बँक ची स्थापना करण्यात आलेली आहे. यात सक्तीच्या पर्यावरण शास्त्र विषयासाठी क्षेत्र अभ्यास म्हणून प्रोजेक्ट तयार करायचा असतो याचाच एक भाग म्हणून पर्यावरण शास्त्र विभाग प्रमुख प्रा अजय नांद्रे यांनी विद्यार्थ्यांना बीज बँकेत कमीत कमी कोणत्याही वृक्षाच्या 30 बिया जमा करायचे आव्हान केले होते. त्या माध्यमातून बहुतांश विद्यार्थ्यांनी बीज संकलन करून बीज बँकेत जमा केले शैक्षणिक वर्ष 2021- 22 या वर्षात साधारणता 2000 च्या जवळपास वेगवेगळ्या प्रकारच्या बियांचे संकलन झाले. संकलित झालेल्या बिया प्रा नांद्रे यांनी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ पी एस सोनवणे यांच्याकडे सुपूर्द केल्या. व प्राचार्यसाहेबांनी महाविद्यालयाने दत्तक घेतलेल्या रामनगर येथील डोंगरावर बीजारोपण करण्यासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ कैलास वाघ यांच्याकडे हस्तांतरित केल्या व राष्ट्रीय सेवा योजना सहभागी असणाऱ्या विद्यार्थ्यांचा एक दिवशी कॅम्प आयोजित करून या बियांचे

बीजारोपण करण्याचे आव्हान केले. महाविद्यालयाने गेल्या दोन वर्षापासून या प्रकल्पाला सुरुवात केली आहे मात्र कोरोना आपत्तीमुळे ज्या बियांचे संकलन केले जायचे ते माजी विद्यार्थी यांच्या माध्यमातून रोपण केले जायचे मात्र यावर्षी सुदैवाने सर्व काही सुरळीत असल्याने यांचे रोपण करण्यासाठी आजी व माजी विद्यार्थ्यांना एकत्रित घेण्याचे आव्हान प्राचार्य साहेब यांनी केले. या कार्यक्रमाप्रसंगी मा प्राचार्य डॉ पी एस सोनवणे, प्रमुख अतिथी म्हणून आदर्श कला महाविद्यालय निजामपूर येथील डॉ रवी ठाकरे तसेच सी गो पाटील महाविद्यालय साक्री येथील, डॉ निकम सर उपस्थित होते. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ कैलास वाघ, डॉ विजय देसले, डॉ वसुमती पाटील, डॉ ममता पंजाबी, डॉ दिनेश माळी प्रा डी एल पाटील, डॉ शरद सोनवणे, डॉ निलेश माळीसकर, प्रा अजय नांद्रे तसेच ज्ञानेश्वर पाटील, देविदास बच्छाव, प्रशांत पवार, किसन सूर्यवंशी सदर कार्यक्रमा प्रसंगी उपस्थित होते